# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

**जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/२००७ /२०२४-२५** **दि.०८/१२/२०२४**

प्रति,
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

**महोदय,**

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(शरद नानेगांवकर)
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.०९/१२/२०२४

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

**स्टेम प्राधिकरणामार्फत घोडबंदर येथील अदानी पॉवर हाऊसच्या पुढे बलवा कंपनीजवळील १३५० मी.मी. व्यासाची जूनी मुख्य जलवाहीनीवरील गळती दुरुस्तीचे काम तसेच खारेगांव (टोलनाका) जवळील मुख्य जलवाहीनीवरील गळती होत असलेला जूना Expansion Joint काढून त्या ठिकाणी नवीन Below Type Expansion Joint टाकण्याची कामे करून घेणेकरीता स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा शुक्रवार दि.१३/१२/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते शनीवार दि.१४/१२/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजेपर्यत (२४ तासाकरीता) बंद राहणार आहे.** तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका